# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

(दुपार)

---

**दिनांक २४.०८.२०२६ सोमवार**

**(कामगिरी)**

**१) खापरखेडा पोलीसांची कामगिरी :— जबरी चोरी करणाऱ्या आरोपींना ६ तासाचे आंत अटक.**

दिनांक २३.०८.२०२६ चे १८.१० वा. चे सुमारास, फिर्यादी अमन त्रिलोचनदास दुबे, वय ३२ वर्षे, रा. पिवळी नदी, धर्मराज हायस्कुल जवळ, महाबळेश्वर नगर, कामठी रोड, यशोधरानगर, नागपुर हे त्यांचे मित्र नामे लखन बादल सेठ, वय २५ वर्षे, रा. पिवळी नदी, कामठी रोड, नागपुर हे त्यांचे ईतर दोन मैत्रीणीसोबत बिनासंगम येथुन दोन दुचाकीने घरी परत जात असतांना, पो. ठाणे खापरखेडा हद्दीत बिना गावाजवळ, बिनासंगम रोडवर एका मोटासायकलजवळ उभे असलेल्या तीन ईसमांनी संगणमत करून, फिर्यादी व त्याचे मित्रांची दुचाकी थांबविली. आरोपींनी फिर्यादीस शिवीगाळ करून व चाकुचा धाक दाखवुन, फिर्यादीजवळील रोख ४९,८००/—रू. गळ्यातील सोन्याची चैन, ०१ मोबाईल फोन असा एकुण २,९६,८००/—रू. चा मुद्देमाल जबरीने हिसकावुन घटनास्थळावरून त्यांचे दुचाकीने पळुन गेले. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे खापरखेडा येथे आरोपींविरूध्द कलम ३०९(४), २९६, ३५१(२), ३५२, १२६(२), ३(५) भा.न्या.सं., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे गांभिर्य लक्षात घेवुन खापरखेडा पोलीसांनी गुन्ह्याचे तपासात आरोपींनी फक्त फिर्यादी यांनाच लुटल्याने त्यांचा सोबत असलेला मित्र यास विचारणा करीत असतांना, फिर्यादीचा मित्र लखन बादल सेठ याने उडवा—उडवीची उत्तरे दिल्याने त्याचेवर पोलीसांचा संशय बळावला. पोलीसांनी त्याचे जवळील मोबाईलची पाहणी केली. त्यामध्ये त्याने त्याचे एका मित्राला व्हाट्सअॅपद्वारे फिर्यादी यांचा फोटा व लोकेशन पाठविल्याचे दिसुन आले. पोलीसांनी तांत्रीक तपास केला असता, फिर्यादीचा मित्र आरोपी क्र. १) लखन बादल सेठ, वय २५ वर्षे, रा. पिवळी नदी, कामठी रोड, नागपुर याने त्याचे ईतर साथीदार आरोपी क्र. २) सक्षम सुशांत डोंगरे, वय २० वर्षे, रा. पिवळी नदी, नागपुर ३) आसिफ मोहम्मद मुस्तकीम अली, वय १९ वर्षे, रा. राधाकृष्ण कॉलोनी, भिलगांव, तह. कामठी, जि. नागपुर ४) भुषण सुनिलजी कांबळे, वय २४ वर्षे, रा. बालाजी नगर, भिलगांव, तह. कामठी, जि. नागपुर व त्यांचा साथीदार एक विधीसंघर्षग्रस्त यांचेसोबत संगणमत करून, वर नमुद जबरी चोरीचा गुन्हा केल्याचे निष्पन्न झाले. सर्व आरोपी व विधीसंघर्षग्रस्त बालकास ताब्यात घेवुन, त्यांची सखोल विचारपुस केली असता, त्यांनी गुन्हा केल्याची कबुली दिली. आरोपींचे ताब्यातुन गुन्ह्यातील संपुर्ण मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. आरोपी १ ते ४ यांना ६ तासाचे आंत अटक करून, विधीसंघर्षग्रस्त बालकास ताब्यात घेवुन खापरखेडा पोलीसांनी गुन्हा उघडकीस आणलेला आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्रीमती विनीता शाहु अपर पोलीस आयुक्त (उत्तर प्रभाग) नागपूर शहर, मा. श्री. रमेश धुमाळ, पोलीस उप आयुक्त (परि. क्र. ६), मा. श्री. अंकुश खेडकर, सहा. पोलीस आयुक्त (कामठी विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. संदीप बुवा, सपोनि. सचिन यादव, पोउपनि. अविनाश निकाळजे, अमोल

पाटील, सफौ. मनोहर राऊत, पोहवा. सगणे, मुकेश महालगावे, अमीत खोब्रागडे, शेखर वानखेडे, मनोहर राऊत, विशाल नाकले, आशिष कापसे, अंजीक्य कदम, महेंद्र, मपोअं. हर्षा व पौर्णिमा यांनी केली.

**२) हुडकेश्वर पोलीसांची कामगिरी :— बनावट जबरी चोरी उघडकीस.**

पोलीस ठाणे हुडकेश्वर येथे फिर्यादी अमोल संतोष धर्नेजा, वय २८ वर्षे, रा. त्रीमुर्ती नगर, नागपुर याने दिनांक २२.०८.२०२६ रोजी पो. ठाणे येथे सुचना दिली की, ते पिरॅमिड सिटी परीसरातुन जात असतांना एका अनोळखी व्यक्तीने लिफ्ट मागितली असता, त्या ईसमाने फिर्यादीस चाकुचा धाक दाखवुन, मारहाण करून, त्यांचेजवळील कार घेवुन पळुन गेला व कारमध्ये रोख २,०५,०००/—रू. असल्याचे सांगीतले. नमुद घटनेतील वाहन विमानतळ परीसर पोलीस ठाणे सोनेगांव हद्दीत मिळुन आले व त्यातील फक्त रोख चोरी गेल्याचे सांगीतले. घटनेचे गांभीर्य लक्षात घेवुन, हुडकेश्वर पोलीसांनी तपास सुरू केला असता, घटनाक्रमात व फिर्यादीचे कथनात विसंगती आढळल्याने तसेच, त्याने वेगवेगळी व परस्परविरोधी माहीती दिल्याने त्याचेवर संशय झाला. पोलीसांनी तांत्रीक तपास करून, त्याचे कथनाची पडताळणी केली असता, लुटमारीची घटना बनावट असल्याचे निष्पन्न झाले. घटनेतील फिर्यादीची सखोल विचारपुस केली असता, त्याने कबुली दिली की, त्याचे त्रिमुर्ती नगरातील बैठक कॅफे सुरू करण्यासाठी त्याने त्याचे मित्राकडुन दोन लाख रूपये घेतले होते. ती रक्कम परत करण्याकरीता त्याचेवर दबाव होता, म्हणुन त्याने त्याचेकडे पैसे नसल्याने लुटमारीचा बनाव केल्यास रक्कम देणे टाळता येईल याविचाराने बनावट जबरी चोरी ची घटना रचल्याचे सांगीतले.

हुडकेश्वर पोलीसांनी घटनेचा योग्य तपास करून, बनाव उघडकीस आणला आहे. वरील कामगिरी मा. श्री. वसंत परदेशी, अपर पोलीस आयुक्त (दक्षिण प्रभाग), मा. श्री. सिंगारेड्डी ऋषीकेश रेड्डी, पोलीस उप आयुक्त (अती. कार्य. परि. क्र. ४), मा. श्री. नरेंद्र हिवरे, सहा. पोलीस आयुक्त (अजनी विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली मवपोनि. श्रीमती अनामिका मिर्झापुरे, सपोनि. पपीन रामटेके, पोहवा. मुकेश किन्नाके, पोअं. ऋषभ ठाकरे यांनी केली.

**नागरीकांना आवाहन करण्यात येते की, कोणतीही घटना घडल्यास, पोलीसांना सत्य व अचुक माहीती द्यावी. पोलीसांची दिशाभुल करून, खोटी माहीती दिल्यास अथवा गुन्ह्याचा बनाव केल्यास संबंधीताविरूध्द कठोर कायदेशिर कारवाई करण्यात येईल.**

**३) गुन्हेशाखा अंमली पदार्थ विरोधी पथकाची कामगिरी :— एम.डी. पावडर बाळगणाऱ्या आरोपींना अटक.**

दिनांक २४.०८.२०२६ चे ०४.०० वा. ते ०६.३० वा. चे दरम्यान, गुन्हेशाखा अंमली पदार्थ विरोधी पथकाचे अधिकारी व अंमलदार यांना खात्रीशीर माहीती मिळाली की, पोलीस ठाणे सदर हद्दीत, बंगला नं. ७/१२ चे बंद गेटसमोरील सर्व्हीस रोडवर, छावणी येथे पांढऱ्या रंगाचे कारजवळ ०२ ईसम उभे असुन ते अंमली पदार्थ विक्री करीत आहेत. अशा मिळालेल्या माहीतीवरून नमुद ठिकाणी जावुन पाहणी केली असता, तेथे प्राप्त वर्णनाचे ईसम हे किया सोनेट कार जवळ संशयीतरित्या कोणाचीतरी वाट बघतांना दिसुन आले. त्यांना घेराव टाकुन ताब्यात घेतले व पंचासमक्ष त्यांचे नाव पत्ता विचारले असता, त्यांनी त्यांची नावे १) संदशे संजय मुन, वय ३७ वर्षे, रा. तिसगांव पाडा, कल्याण, जि. ठाणे २) शारीक अमानत खोकर, वय २८ वर्षे, रा. गांधी ले—आऊट, जाफर नगर, नागपूर असे सांगीतले. त्यांचेजवळ अंमली पदार्थ असल्याचे दाट संशयावरून, एनडीपीएस कायद्यातील तरतुदींचे पालन करुन, त्यांची व कारची झडती घेतली असता, कारमध्ये आरोपींचे ताब्यात झिपलॉक पन्नीमध्ये एकुण ५३ ग्रॅम ७०० मि.ग्रॅ. एम.डी. पावडर मिळून आली. आरोपींचे ताब्यातुन एम. डी. पावडर, ०३ मोबाईल फोन व किया सोनेट कार एम.एच. ३१ एफएक्स ७७१९ असा एकुण १७,११,२००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपींना अधिक विचारपुस केली असता, त्यांनी त्यांचा साथीदार पाहीजे आरोपी नामे वारीस अन्सारी, रा. भायखळा, वेस्ट मुंबई याचे मदतीने एम.डी पावडर विक्री

करण्याकरीता आणल्याचे सांगीतले. आरोपींचा अभिलेख तपासला असता, आरोपी क्र. १ याचे विरूध्द एनडीपिएस ॲक्ट अन्वये पो. ठाणे सक्करदरा व राणाप्रतापनगर येथे गुन्हे दाखल असल्याचे आढळुन आले.

आरोपी हे स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता एम.डी. पावडर विक्री करण्याकरीता बाळगताना समक्ष मिळुन आले. आरोपींचे कृत्य हे कलम ८(क),२२(क),२९ एन.डी.पी.एस. ॲक्ट नुसार होत असल्याने, आरोपींविरूध्द पोलीस ठाणे सदर येथे गुन्हा नोंदविण्यात आला आहे. आरोपींना अटक करण्यात आली आहे. आरोपींना मुद्देमालासह पुढील कारवाईस्तव सदर पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पाहीजे आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. भारत क्षिरसागर, पोउपनि. नागेश पुन्नावाड, पोहवा. अरविंद गेडेकर, शैलेष दोबोले, रत्नाकर कोठे पोअं. शेषराव रेवतकर, धनपत मंझरेटे व धनराज यांनी केली.



**<u>४) नागपूर शहर पोलीसांची म.दा.का., जुगार व मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—</u>**

दिनांक २३.०८.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत, म.दा.का. व अंमली पदार्थ कायद्यान्वये २५ केसेसमध्ये २८ ईसमावर कारवाई करून एकुण ६,६३,३९५/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली ३,४५२ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. १,३०,९००/—रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.

दिनांक २३.०८.२०२६ चे २३.०० वा. ते दिनांक २४.०८.२०२६ चे ०५.०० वा. चे दरम्यान, केलेल्या रात्रगस्तीमध्ये कलम १३५ म.पो.का. कायद्यान्वये **२९** ईसमांवर कारवाई करण्यात आलेली आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**(गुन्हे)**

**<u>१) पोलीस ठाणे नविन कामठी :— खंडणी मागणाऱ्या आरोपीस अटक.</u>**

पोलीस ठाणे नविन कामठी हद्दीत, रनाळा रोड, नविन कामठी येथे फिर्यादी डॉ. तन्जीम आजमी वल्द अल्ताफुर, वय ४६ वर्षे यांचे सिटी हॉस्पीटल आहे. दिनांक १८.०६.२०२६ रोजी फिर्यादी चे हॉस्पीटल मध्ये ईसम नामे गुलाम नझर वल्द शेख मोहम्मद, वय २७ वर्षे, रा. कादर झेंडा चौक, कामठी, नागपुर हा त्याची

प्रकृती बरी नसल्याने उपचाराकरीता आला होता. फिर्यादी यांनी नमुद ईसमाचा मोफत उपचार करून, त्याला घरी पाठविले होते. दिनांक २१.०८.२०२६ चे २०.४८ वा. ते २२.०८.२०२६ चे ०२.०० वा. चे दरम्यान गुलाम नझर याने फिर्यादीचे हॉस्पीटलमध्ये येवुन, फिर्यादीस म्हटले की, मी हॉस्पीटल ची बदनामी करणारा व्हिडीओ सोशल मिडीयावर टाकुन हॉस्पीटल ची बदनामी करील, हॉस्पीटलची बदनामी होवुन द्यायची नसेल, तर मला २,००,०००/—रू. द्यावे लागतील, असे म्हणुन फिर्यादीस शिवीगाळ केली व चाकुने मारण्याची धमकी दिली.

यापकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे नविन कामठी येथे मपोउपनि. कदम ७०२०५३७६४६ यांनी आरोपी गुलाम नझर विरूध्द कलम ३०८(३), ३०८(४), ३५२, ३५६(२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करून, पोलीसांनी त्वरीत दखल घेवुन, तपास पथकासह आरोपीचा शोध घेवुन, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे एमआयडीसी :— शस्त्रासह धुमधाम करणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक २३.०८.२०२६ चे २३.२० वा. चे सुमारास, एमआयडीसी पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहिती मिळाली की, ट्रॅक्टर कंपनीमागे, हिंगणा रोड येथे एक ईसम लोकांना विनाकारण शिवीगाळी करून, दमदाटी करीत आहे. अशा माहितीवरून नमुद ठिकाणी गेले असता, तेथे मिळालेल्या वर्णनाचा ईसम हातात लोखंडी कोयता घेवुन धुमधाम करतांना दिसुन आला. त्यास घेराव टाकुन ताब्यात घेवुन, निशस्त्र केले ईसमास त्याचे नांव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नांव तौसिफ मन्सुरी शेख चॉद मन्सुरी, वय ३० वर्षे, रा. मेहरवाडी, तह. किवलारी, जि. शिवनी, मध्य प्रदेश ह.मु.— भिमनगर, पाण्याचे टाकीजवळ, हिंगणा रोड, नागपूर असे सांगीतले. आरोपीचे ताब्यातुन एक लोखंडी कोयता कंमती अंदाजे ३००/— रू. चा जप्त करण्यात आला. आरोपी हा कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने कोयता बाळगुन धुमधाम करतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, सरतर्फे फिर्यादी पोहवा. जितेंद्र खरपुरीया यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे एमआयडीसी येथे पोउपनि. पंकज सयाम यांनी आरोपीविरूध्द कलम ४, २५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**१) पोलीस ठाणे अजनी :—** दिनांक २०.०८.२०२६ चे ०८.०० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे अजनी हद्दीत, मेडीकल हॉस्पीटल परीसर, सुलभ शौचालय जवळ एक अनोळखी पुरूष वय अंदाजे ५५ वर्षे वयाचे, बेशुध्द अवस्थेत मिळुन आल्याने, त्यांना एमएसएफ चे कर्मचारी यांनी उपचाराकरीता मेडीकल हॉस्पीटल वार्ड क्र. ५१ येथे दाखल केले होते. उपचारादरम्यान दिनांक २४.०८.२०२६ चे ०२.०० वा. डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषीत केले. मृतकाची ओळख अद्याप पटलेली नाही. मृतकास ओळखणाऱ्यांनी पोलीस ठाणे अजनी येथे संपर्क साधावा.

यापकरणी फिर्यादी प्राप्त वैद्यकीय सुचनेवरून पोलीस ठाणे अजनी येथे पोउपनि. अल्तानुर शेख यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे सोनेगांव :—** दिनांक २४.०८.२०२६ चे ०४.३० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे सोनेगांव हद्दीत सि/१८, मुळीक कॉम्प्लेक्स, उज्ज्वल नगर, वर्धा रोड, सोनेगांव येथे राहणारे प्रतीक पुरूषोत्तम बारसिंगे, वय ३४ वर्षे यांना त्यांचे पत्नीने वारंवार फोन करून ते उत्तर देत नसल्याने, त्या त्यांचे आईचे घरून, आपले घरी आल्या त्यांनी टेकवलेले दार उघडुन घराचे आंत पाहणी केली असता, त्यांचे पती हॉलमधील गॅलरीत ठेवलेल्या कुलर जवळ, बेशुध्द अवस्थेत पडलेले दिसले. त्यांना उपचाराकरीता मेडीकल हॉस्पीटल येथे नेले असता, उपचारादरम्यान ०६.४५ वा. चे सुमारास डॉक्टरांनी त्यांना तपासुन मृत घोषीत केले.

याप्रकरणी प्राप्त वैद्यकीय सुचनेवरून पोलीस ठाणे सोनेगांव येथे पोउपनि. राजेश राठोड ९५२७५६४५५० यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**स्वा/—**
**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**